# मेट्रो ३ : ब्लू स्टार करणार वायू व्हिजन पर्यावरण

**। मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो ३ मार्गिकेदरम्यान मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन अंतर्गत टप्पा २ च्या बीकेसी ते मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकांच्या वायू व्हिजन अर्थात व्हेंटिलेशन आणि पर्यावरण नियंत्रण प्रणालीच्या उभारणीसाठी ब्लू स्टार लिमिटेडची निवड करण्यात आली आहे. ही निवड आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रियेद्वारे जायकाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार करण्यात आली आहे.

ब्लू स्टार लिमिटेड समूह मेट्रो ३ च्या बीकेसी ते मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकांदरम्यानच्या वायू व्हिजन आणि पर्यावरण नियंत्रण प्रणाली यंत्रणेचे काम करणार आहेत. ज्यामध्ये संपूर्ण यंत्रणेचे आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंग या कामांचा समावेश असणार आहे.

वायू व्हिजन यंत्रणा ही महत्त्वपूर्ण यंत्रणा आहे. त्यामुळे बोगद्यातील हवेचे



तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत होते. तसेच आपत्कालीन परिस्थिती धुराच्या निर्गमनासाठी देखील या यंत्रणेचा वापर होणार आहे. एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी मेट्रो ३ प्रकल्पासाठी तांत्रिकदृष्ट्या अद्ययावत वायू व्हिजन आणि पर्यावरण नियंत्रण प्रणालीची उभारणी करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले आहे.